**नि. फौ.ख.क्र.३९/२०१९**

**शासन वि.  शशिकांत**

**नि.क्र.२७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४**

नावः संजय किसनराव शिंदे,

वयः ५३ वर्ष, धंदाः सहा.फौ. बं नं ११६१,

पत्ताः पो.ठा. पारशिवनी, तहसील पारशिवनी, जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.४ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** दिनांक ०४/०६/२०१९ रोजी मी पो.स्टे. पारशिवनी येथे पो.हवा या पदावर कार्यरत होतो. त्या रोजी मी स्टेशन डायरी अमलदार म्हणून कर्तव्यावर होतो. त्या रोजी फिर्यादी सुनिता हिने तोंडी फिर्याद दिली. त्यावरुन मी छापील प्रथम खबरी अहवाल नोंदविला. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२८** देण्यात आला. जखमींच्या वैद्यकीय तपासणी करिता पत्र दिले. आता मला सदर पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात आली. जखमीचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला व त्यावरुन गुन्हा नोंद करण्यात आला.
सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे श्री पी.एस. सायरे वकील साहेब यांचे तर्फे उलटतपास सुरु.**

**२.** कथित घटनेच्या रोजी पो.नीरीक्षक पो.स्टे. येथे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, दखल पात्रा गुन्ह्याची माहिती मिळाल्यास एफ.आय.आरची नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, एफ.आय.आर नोंदविल्यानंतर २४ तासांच्या आत त्याची प्रत न्यायालयात पाठवावी लागते. मी एफ.आय.आर ची प्रत न्यायालयात पाठविली होती.

न्यायालयात एफ.आय.आर. प्रत पाठविल्याबाबत पुरावा मला तपासी अमलदार यांनी मागितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या दस्तावर व्यक्तीचे नाव व हुद्दा लिहिला असेल त्यावर त्याची सही घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, एफ.आय.आर वर पो.निरीक्षक यांची सही घेणे बंधनकारक असते. सदर प्रकरणातील एफ.आय.आर व पो.निरीक्षक यांची सही न घेण्याचे कारण असे की, त्यांच्या वतीने स्टेशन डायरी अमलदार हे सही करतात. कायद्याच्या कोणत्या कलमामध्ये सदर बाब नमूद आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तर्फे म्हणून सह्या करताना त्या संबंधाची नोंद सहीच्या ठिकाणी द्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२८ मध्ये 'तर्फे' नमूद नाही, त्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एफ.आय.आर मध्ये विलंबाच्या कारणाचा रकाना असतो. सदर प्रकरणात तक्रार प्राप्त होताच गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**३.** दिनांक ०३/०६/२०१९ रोजी रात्री १२:०० वाजताच्या आत तक्रार प्राप्त झाली. फिर्यादी जखमी असल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करुन वैद्यकीय अहवाल प्राप्त करावयाचे होते. वैद्यकीय अहवाल प्राप्त केल्यानंरत एफ.आय.आरची नोंद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, विलंबाच्या कारणाच्या रकान्यात सदर बाब नमूद नाही, ती का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथित नि.क्र.२८ वर पो.निरीक्षक यांची सही नसल्याने ती न्यायशुन्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःच्या मर्जीने एफ.आय.आर तयार केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.02.11 17:14:31 +0530

(जी.ओ. वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.02.11 17:14:35 +0530

(जी.ओ. वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ११/०२/२०२५